दै.सागर - २८/१२/२०२०

# भविष्यात ऑक्सिजन मिळण्यासाठी प्रत्येकाने एक तरी झाड लावा : पर्यावरण मित्र महंमद शेख



पर्यावरण मित्र महंमद शेख यांचे आवाहन ऐकताना सह्याद्री शिक्षण संस्थेचा विद्यार्थी गण

सावर्डे :- भविष्यात जर तापमान वाढ झाली, झाडे नष्ट झाली तर मात्र प्रत्येकाला पाठीवरती छोटंसं ऑक्सिजन सिलेंडर घेऊन फिरावं लागेल. हे जर वाचवायचे असेल तर प्लास्टिक कचरा धूप याविषयी प्रबोधन करावे असे आवाहन शेख महंमद या पर्यावरणप्रेमींनी केले. संपूर्ण भारतामध्ये सायकल प्रवासाच्या माध्यमातून जागतिक तापमान वाढ, पर्यावरण या संदर्भात जनजागृती करण्यासाठी मुंबईतून बाहेर पडलेले शेख मोहंमद हे रविवारी सावर्डे येथे पोहचले. चिपळूण संगमेश्वर मतदार संघाचे आमदार श्री. शेखर निकम यांनी सह्याद्री शिक्षण संस्थेच्यावतीने स्वागत केले. सावर्डे येथे कला महाविद्यालय व सह्याद्री क्रीडा प्रबोधिनी सावर्डे येथील विद्यार्थ्यांना त्यांनी मार्गदर्शन केले.

ही पृथ्वी वाचवायची असेल तर आजच्या तरुणांनी पुढे यायला पाहिजे. संपूर्ण जगामध्ये तापमान वाढीचा प्रश्न निर्माण झाला असून पर्यावरणाची हानी रोखण्याचं काम आजचा तरुण करू शकेल असे त्यांनी सांगितले. प्रत्येकाने एक झाड लावलं पाहिजे आणि ते जगवल पाहिजे. आज आपल्याला तोंडावरती मास्क बांधून गेले दहा महिने फिरावं लागेल असं स्वप्नात कुणालाही वाटलं नव्हतं. जेणेकरून शुद्ध हवा आणि आपल्याला पाणी मिळेल अनेक प्रकारचे समुद्रातून येणारी वादळे, त्सुनामी यामुळे समुद्रकाठचा परिसर हा धोकादायक बनला आहे. कोकणला फार मोठा किनारा लाभलेला आहे. त्यामुळे पर्यावरणाची जागृती ही जगाबरोबर आपणाला करायला पाहिजे. त्यासाठी आपण ती जागृती करावी. प्रत्येकाने एक चांगलं काम म्हणून सोशल मीडियावरती पर्यावरण जागृतीविषयी आपले मत व्यक्त करावे. मृत्युनंतर आपण स्वर्गात जागा पाहिजे असेल तर देव विचारेल की, पृथ्वीवरील काय चांगलं काम केलं? तर पृथ्वीची कोणत्या प्रकारची हानी मी केली नाही. मी झाडे लावली एवढं सांगितलं तरी स्वर्गात जागा मिळेल असे शेख महमद यानी सांगितले.



चिपळूण : विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना शेख मोहम्मद. सोबत अन्य मान्यवर.

पुढारी, २८/१२/२०२०

# पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी एकतरी झाड लावा : शेख मोहम्मद

## सायकल भ्रमंतीद्वारे पर्यावरण रक्षणाचा संदेश

**सावर्डे : पुढारी वृत्तसेवा**

जगभरात तापमानवाढीचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. त्यामुळे पर्यावरणाची हानी टाळायची असेल तर प्रत्येकाने एक झाड लावणे आवश्यक आहे. आजची तरुण पिढी ते करू शकेल, असा आशावाद शेख मोहम्मद यांनी व्यक्त केला.

संपूर्ण देशभरात सायकल प्रवासाच्या माध्यमातून जागतिक तापमानवाढ, पर्यावरण संदर्भात ते जनजागृती करण्यासाठी मुंबईतून निघाले आहे. रविवारी ते सावर्डेत आले असता आ. शेखर निकम यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी त्यांनी कला महाविद्यालय सावर्डे व क्रीडा प्रबोधिनीला भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

ते म्हणाले, आजच्या तरूण पिढीने पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी पुढे यायला हवे. एकतरी झाड लावणे गरजेचे आहे. नाहीतर भविष्यात ऑक्सिजन मिळणे कठीण बनणार आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य तानाजी कांबळे यांनी केले. सह्याद्री क्रीडा प्रबोधिनीचे प्रशिक्षक रोहित गमरे यांनी स्वागत केले.

दै.सकाळ - ०८/०१/२०२०

# सावर्डेमध्ये उलगडला जांभेकरांचा जीवनपट

सकाळ वृत्तसेवा 8/1/2020

चिपळूण ता. ७ : सावर्डे कला महाविद्यालयातील मराठी, हिंदी व इंग्रजी वाङ्मय मंडळातर्फे बाळशास्त्री जांभेकर जयंती व मराठी भाषा पंधरवडा साजरा करण्यात आला.

प्राचार्य तानाजी कांबळे यांनी प्रास्ताविक केले. बाळशास्त्री जांभेकर यांचा जीवनपट उलगडताना अल्पायुष्यात ज्ञान मिळवून त्यांनी ज्ञानप्रसार व लोकजागृती केली. मराठी भाषेबरोबर हिंदी, इंग्रजी याचबरोबर बारा भाषेचे ज्ञान असलेले विद्यार्थ्यांना ते प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व होते.

प्रमुख पाहुणे कवी अनमोल सुतार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यांनी चित्रपट-मालिका याच्यात पटकथा-संवाद कसे लिहिले जातात, यावर भाष्य केले तसेच एखादे शीर्षकगीत लिहीत असताना संपूर्ण मालिकेचा सारांश त्याच्यामध्ये कसा येतो, ते कसे केले जाते, याचे उदाहरण देऊन सांगितले.

राज्यस्तरीय कविसंमेलन यामध्ये समावेश असणारी कविता ती दूर जाते, सादर केली. तसेच कविता कशी सुचते, या विषयी त्यांनी सांगितले. स्वतःला व्यक्त व्हायचे असेल तर व्यक्त होण्यासाठी ब्लॉग तुम्ही लिहिले पाहिजे.

कार्यक्रमास महाविद्यालयात प्राध्यापक दीप्ती शेंबेकर, सेजल रंगाटे, सुनील जावीर, रेखा भवरे उपस्थित होते. प्रा. जयसिंग चौरे यांनी स्वागत केले. प्रा. संकेत कुरणे यांनी आभार मानले.

दै.सागर - ०७/०१/२०२०

# सावर्डे कला महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती

**चिपळूण (प्रतिनिधी) :** सावर्डे येथील कला महाविद्यालयात महिला विकास कक्ष यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी प्रा. दीप्ती शेंबेकर यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याविषयी माहिती दिली. प्रा. शेंबेकर म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले यांनी अस्पृश्यता निवारण बरोबर स्त्रीमुक्ती चळवळीतील योगदान खूप मोठे आहे. स्त्रियांना शारीरिक, मानसिक आणि गुलामगिरीतून बाहेर काढण्याचा प्रयत्न खऱ्या अर्थाने सावित्रीबाईंनी केला. स्त्रियांच्या केशवपन, सतीची चाल, यासारख्या प्रथांना त्यांनी विरोध केला. चूल आणि मूल यातून स्त्री मुक्त करून आजची स्त्री आकाशात भरारी घेत आहे ते फक्त सावित्रीबाई यांच्यामुळेच असे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. सुजल रंगाटे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मेघा सावर्डेकर यांनी तर आभार अनुष्का काजरोळकर यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

८/१/२०२०

# कला महाविद्यालय सावर्डे येथे बाळशास्त्री जांभेकर यांची जयंती साजरी

**सावर्डे :-** कला महाविद्यालयातील मराठी हिंदी व इंग्रजी वाङःमय मंड्ळाच्यावतीने बाळशास्त्री जांभेकर व मराठी भाषा पंधरावडा दिन साजरा करण्यात आला यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य तानाजी कांबळे यांनी केले. बाळशांस्त्री जांभेकर यांचा जीवनपट उलगडताना अल्पायुष्यात ज्ञान मिळवून त्यांनी ज्ञानप्रसार व लोकजागृती केली मराठी भाषेबरोबर हिंदी इंग्रजी याचबरोबर बारा भाषेचे ज्ञान असलेले विद्यार्थ्यांनाते प्रेरणादायी व्यक्तिमत्व होते.

यावेळी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे कवी अनमोल सुतार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले मार्गदर्शन करताना त्याने चित्रपट मालिका याच्यामध्ये पटकथा–संवाद कसे लिहिले जातात त्याच्यावरती भाष्य केले तसेच एखादे शीर्षकगीत लिहित असताना संपूर्ण मालिकेचा सारांश त्याच्यामध्ये कसा येतो ते कसे केले जाते याचे उदाहरण देऊन सांगितले राज्यस्तरीय कविसंमेलन यामध्ये समावेश असणारी कविता ती दूर जाते सादर केली तसेच कविता कसे सुचते याविषयी त्यांनी सांगितले जर विद्यार्थ्यांने खूप वाचन केले पाहिजे त्याचबरोबर समाजाकडे बघताना उघडे डोळे ठेवून बघायला पाहिजे. २१/१२/१८ 7/1/2020

दै.सकाळ - ०७/०१/२०२०

# सावित्रीबाई फुलेंना आदरांजली

**चिपळूण :** चूल व मूल यातून स्त्रीला मुक्त करत त्यांना नवी भरारी मिळवून देण्याचे कार्य सावित्रीबाई फुले यांनी केले, असे प्रतिपादन प्रा. दीप्ती शेंबेकर यांनी केले. सह्याद्री शिक्षण संस्थेच्या सावर्डे कला महाविद्यालयात महिला विकास कक्ष यांच्या वतीने सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली. या सर्व कार्याची नोंद घेत ३ जानेवारी हा दिवस बालिका दिन म्हणून साजरा केला जातो. तरीही आज स्त्रियांवर अन्याय आणि अत्याचार होत आहेत. या अन्याय-अत्याचाराविरुद्ध प्रत्येक महिलांमध्ये धाडस निर्माण करण्यासाठी सावित्रीबाई फुले यांचा विचार प्रत्येक स्त्रीमध्ये रुजायला पाहिजे, असे त्यांनी सांगितले. प्रास्ताविक प्रा. सुजल रंगाटे यांनी तर सूत्रसंचालन मेघा सावर्डेकर यांनी केले.

7/1/2020